
लोकमत



शिवाजी विद्यापीठात डॉ. भारती पाटील संपादित 'कोल्हापुरातील कर्तृत्ववान स्त्रिया : भाग-२' या पुस्तकाचे प्रकाशन खासदार सुप्रिया सुळे यांच्या हस्ते झाले. यावेळी डॉ. भारती पाटील, सरोज पाटील, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. प्रमोद पाटील आणि कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे उपस्थित होते.

# महिलांचा निर्णय प्रक्रियेत समावेश आवश्यक: सुप्रिया सुळे

## 'कोल्हापुरातील कर्तृत्ववान स्त्रिया ' पुस्तकाचे प्रकाशन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** महिलांना निर्णय प्रक्रियेत सामावून घेऊन त्यांना त्यासाठी ताकद देणे यातून त्यांचे खऱ्या अर्थाने सक्षमीकरण शक्य आहे, असे प्रतिपादन खासदार सुप्रिया सुळे यांनी मंगळवारी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या कै. शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासनातर्फे आयोजित 'कोल्हापुरातील कर्तृत्ववान स्त्रिया : भाग-२' या डॉ. भारती पाटील संपादित पुस्तकाच्या प्रकाशन समारंभाच्या प्रमुख पाहुण्या म्हणून 'स्त्री सक्षमीकरण : आव्हाने व संधी' या विषयावर त्या बोलत होत्या. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील आणि सरोज पाटील प्रमुख उपस्थित होते.

खासदार सुळे म्हणाल्या, महिला सक्षमीकरणासाठी महिला शैक्षणिक, सामाजिक आणि आर्थिक आघाड्यांवर आत्मनिर्भर बनल्या पाहिजेत. राज्याची, देशाची आर्थिक घडी बसविण्यामध्ये त्यांचा सहभाग असला पाहिजे. सरोज पाटील म्हणाल्या, कोणतेही मूल विद्वत्ता घेऊनच जन्मते. त्याची गुणवत्ता पाहून त्याला योग्य पैलू पाडणे गरजेचे असते. डॉ. भारती पाटील यांनी स्वागत केले. प्रांजली क्षीरसागर, ऊर्मिला दशवंत यांनी सूत्रसंचालन केले, तर कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले.

लोकसत्ता

# महिलांना निर्णयप्रक्रियेत सामावल्यास खरे सक्षमीकरण : सुप्रिया सुळे

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**



**कोल्हापूर :** महिलांना निर्णयप्रक्रियेत सामावून घेऊन त्यांना त्यासाठी ताकद दिल्यानेच खऱ्या अर्थाने सक्षमीकरण होईल, असे प्रतिपादन खासदार सुप्रिया सुळे यांनी मंगळवारी येथे केले. शिवाजी विद्यापीठाच्या शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासनातर्फे आयोजित 'कोल्हापुरातील कर्तृत्ववान स्त्रिया : भाग-२' या डॉ. भारती पाटील संपादित पुस्तकाच्या प्रकाशन समारंभाच्या प्रमुख पाहुण्या म्हणून 'स्त्री सक्षमीकरण : आव्हाने व संधी' या विषयावर त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के होते. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील आणि सरोजमाई पाटील प्रमुख उपस्थित होते.

सुळे म्हणाल्या, 'राज्याची, देशाची आर्थिक घडी बसविण्यामध्ये महिलांचा धोरणात्मक निर्णयप्रक्रियेमध्ये मोठ्या प्रमाणात समावेश होणे आवश्यक आहे. स्त्री मुक्तीच्या दिशेने वाटचाल करताना पुरुषांचा द्वेष करण्याची आवश्यकता नाही. फुले, शाहू, आंबेडकर यांच्यासारख्या महापुरुषांमुळे या देशात स्त्री-पुरुष समतेचे आणि स्त्री सन्मानाचे वारे निर्माण झाले असल्याने या प्रवासात आपण पुरुषांना सोबत घेऊन वाटचाल करणे गरजेचे आहे.

सरोज पाटील यांनी मातोश्री शारदाबाई पवार यांच्या जीवनसंघर्षाबद्दलही उपस्थितांना अवगत केले. अध्यासनाच्या समन्वयक डॉ. भारती पाटील यांनी स्वागत, प्रास्ताविक केले. प्रांजली क्षीरसागर, ऊर्मिला दशवंत यांनी सूत्रसंचालन, कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी आभार मानले.

पुस्तकाविषयी - डॉ. भारती पाटील यांनी संपादित केलेल्या या ४०० पानांच्या पुस्तकात कोल्हापुरातील स्वातंत्र्य चळवळीसह शैक्षणिक, राजकारण, अर्थकारण आणि समाजकारण या क्षेत्रांमध्ये कर्तृत्व गाजविणाऱ्या ३४ स्त्रियांच्या कार्याचा वेध घेण्यात आला आहे.

24 SEP 2025

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महिलांचे निर्णय प्रक्रियेत समावेशन आवश्यक

## खा. सुप्रिया सुळे; शिवाजी विद्यापीठात 'कोल्हापुरातील कर्तृत्ववान स्त्रिया : भाग-२' पुस्तकाचे प्रकाशन

कोल्हापूर : प्रतिनिधी

महिलांना निर्णय प्रक्रियेत सामावून घेऊन त्यांना त्यासाठी ताकद देणे यातून त्यांचे खऱ्या अर्थाने सक्षमीकरण शक्य आहे, असे प्रतिपादन खा. सुप्रिया सुळे यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या कै. श्रीमती शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासनातर्फे आयोजित 'कोल्हापुरातील कर्तृत्ववान स्त्रिया : भाग-२' या डॉ. भारती पाटील संपादित पुस्तकाच्या प्रकाशन समारंभाच्या प्रमुख पाहुण्या म्हणून 'स्त्री सक्षमीकरण : आव्हाने व संधी' या विषयावर त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के होते. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील आणि सरोज पाटील प्रमुख उपस्थित होते.

खा. सुळे म्हणाल्या, महिला सक्षमीकरणासाठी महिला शैक्षणिक, सामाजिक आणि आर्थिक आघाड्यांवर आत्मनिर्भर बनल्या पाहिजेत. राज्याची, देशाची आर्थिक घडी बसविण्यामध्ये त्यांचा सहभाग असला पाहिजे. धोरणात्मक निर्णय प्रक्रियेमध्ये त्यांचे समावेशन होणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे मुली-महिलांनी आपले निर्णय स्वातंत्र्य अबाधित राखून आपल्या मताशी ठाम राहायला हवे. वेळप्रसंगी ठामपणे 'नाही' म्हणायलाही शिकायला हवे. स्त्री सन्मानाची सुरुवात आपल्या घरापासून केली पाहिजे. स्त्री मुक्तीच्या दिशेने वाटचाल करीत असताना पुरुषांचा द्वेष करण्याची आवश्यकता नाही. किंबहुना, फुले, शाहू, आंबेडकर यांच्यासारख्या महापुरुषांमुळे या देशात स्त्री-पुरुष समतेचे आणि स्त्री सन्मानाचे वारे निर्माण झाले आहे. त्यामुळे या प्रवासात आपण पुरुषांना सोबत घेऊन वाटचाल करणे गरजेचे असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

सरोज पाटील म्हणाल्या, कोणतेही मुल विद्वत्ता घेऊनच जन्मते. त्याची गुणवत्ता पाहून त्याला योग्य पैलू पाडणे गरजेचे असते. सुप्रिया सुळे यांनी केलेली प्रगती अभिमानास्पद असून, त्यापाठी त्यांच्या आई-वडिलांचे मोठे योगदान असल्याचेही त्यांनी सांगितले. आपल्या मातोश्री शारदाबाई पवार यांच्या जीवन संघर्षाबद्दलही त्यांनी उपस्थितांना अवगत केले.

मान्यवरांच्या हस्ते शारदाबाई पवार यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले. त्यानंतर अध्यासनाच्या समन्वयक डॉ. भारती पाटील यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. प्रांजली क्षीरसागर, उर्मिला दशवंत यांनी सूत्रसंचालन केले, तर कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी आभार मानले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात डॉ. भारती पाटील संपादित 'कोल्हापुरातील कर्तृत्ववान स्त्रिया : भाग-२' या पुस्तकाच्या प्रकाशन समारंभात बोलताना खा. सुप्रिया सुळे.

### ■ कर्तृत्ववान ३४ स्त्रियांच्या कार्याचा वेध

डॉ. भारती पाटील यांनी 'कोल्हापुरातील कर्तृत्ववान स्त्रिया : भाग-२' हे पुस्तक संपादित केले आहे. कोल्हापुरातील स्वातंत्र्य चळवळीसह शैक्षणिक, राजकारण, अर्थकारण आणि समाजकारण या क्षेत्रांमध्ये कर्तृत्व गाजवणाऱ्या ३४ स्त्रियांच्या कार्याचा वेध यामध्ये घेण्यात आला आहे.

सकाळ

# 'स्त्री मुक्ती'च्या प्रवासात पुरुषांना सोबत घ्या

## सुप्रिया सुळे : 'कोल्हापुरातील कर्तृत्ववान स्त्रिया : भाग-दोन'चे विद्यापीठात प्रकाशन

■ **सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २३ : फुले, शाहू, आंबेडकर यांच्यासारख्या महापुरुषांमुळे या देशात स्त्री-पुरुष समतेचे आणि स्त्री सन्मानाचे वारे निर्माण झाले आहे. त्यामुळे या स्त्री मुक्तीच्या प्रवासात आपण पुरुषांना सोबत घेऊन वाटचाल करणे गरजेचे आहे. महिलांना निर्णयप्रक्रियेत सामावून घेऊन त्यांना त्यासाठी ताकद देणे यातून त्यांचे खऱ्या अर्थाने सक्षमीकरण शक्य आहे, असे प्रतिपादन खासदार सुप्रिया सुळे यांनी आज येथे व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या कै. श्रीमती शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासनातर्फे समन्वयक डॉ. भारती पाटील यांनी संपादित केलेल्या 'कोल्हापुरातील कर्तृत्ववान स्त्रिया : भाग-दोन' या पुस्तकाच्या प्रकाशन समारंभाच्या प्रमुख पाहुण्या म्हणून 'स्त्री सक्षमीकरण : आव्हाने



कोल्हापूर : डॉ. भारती पाटील संपादित 'कोल्हापुरातील कर्तृत्ववान स्त्रिया : भाग-दोन' या पुस्तकाचे प्रकाशन खासदार सुप्रिया सुळे यांच्या हस्ते झाले. यावेळी डावीकडून डॉ. पाटील, सरोज पाटील (माई), कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आदी.

व संधी' या विषयावर त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, तर प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, सरोज पाटील आदी प्रमुख उपस्थित होते.

खासदार सुळे म्हणाल्या, राज्याची, देशाची आर्थिक घडी बसविण्यामध्ये महिलांचा सहभाग असला पाहिजे. धोरणात्मक निर्णयप्रक्रियेमध्ये त्यांचे मोठ्या प्रमाणात समावेशन होणे आवश्यक आहे. आजही ग्रामपंचायत, जिल्हा परिषद, पंचायत समिती, महापालिकेतील महिलांची पदे त्यांचे पतीच चालवतात, ही मोठी शोकांतिका आहे. त्यामुळे सामाजिक परिवर्तनाची सुरुवात प्रत्येकाने स्वतःपासून करावी. स्त्री सन्मानाची सुरुवात आपल्या घरापासून केली पाहिजे.'

सरोज पाटील यांनी कोणतेही मूल विद्वत्ता घेऊनच जन्मते. त्याची गुणवत्ता पाहून त्याला योग्य पैलू पाडणे गरजेचे असते. सुप्रिया सुळे यांनी केलेली प्रगती अभिमानास्पद असून, त्यामागे तिच्या आईवडिलांचे मोठे योगदान असल्याचे त्यांनी सांगितले. आपल्या मातोश्री शारदाबाई पवार यांच्या जीवनसंघर्षाचा पटही त्यांनी उलगडला. मान्यवरांच्या हस्ते शारदाबाई पवार यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले. डॉ. भारती पाटील यांनी प्रास्ताविक केले. प्रांजली क्षीरसागर, ऊर्मिला दशवंत यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले.

### ■ विविध ३४ स्त्रियांच्या कार्याचा वेध

'कोल्हापुरातील कर्तृत्ववान स्त्रिया : भाग-दोन' या चारशे पानांच्या पुस्तकात कोल्हापुरातील स्वातंत्र्य चळवळीसह शैक्षणिक, राजकारण, अर्थकारण, समाजकारण या क्षेत्रांमध्ये कर्तृत्व गाजविणाऱ्या ३४ स्त्रियांच्या कार्याचा वेध घेतला आहे.

2 4 SEP 2025

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'कृत्रिम बुद्धिमत्ता आणि समाज'वर चर्चासत्र

## कमला कॉलेजमध्ये आयोजन; शेती, ऊर्जा क्षेत्रात वाढता उपयोग

कोल्हापूर, ता. २३ : ताराराणी विद्यापीठाच्या कमला कॉलेजमध्ये 'कृत्रिम बुद्धिमत्ता आणि समाज' या विषयावर एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र झाले. कार्यक्रमाचे उद्‌घाटन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते झाले.

अध्यक्षस्थानी ताराराणी विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष प्राचार्य. डॉ. क्रांतिकुमार पाटील होते. यावेळी उपाध्यक्ष प्रा.डॉ. एस. एन. पवार, सचिव प्राजक्त पाटील, प्राचार्या डॉ. तेजस्विनी मुडेकर यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. शिर्के यांनी, कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे शेती, आरोग्य व ऊर्जा क्षेत्रात क्रांती होत असल्याचे सांगितले. ते म्हणाले की; "२१ वे शतक हे माहितीचे शतक असून, विश्वासार्ह डेटा




कोल्हापूर : कमला कॉलेजमध्ये एकदिवसीय बहुविद्याशाखीय राष्ट्रीय चर्चासत्रामध्ये बोलताना कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के, मंचावर मान्यवर.

हीच खरी संपत्ती आहे. मानवी जीवन आणि समाजाच्या प्रगतीसाठी एआयचा वापर सर्वच क्षेत्रांत व्हावा." क्रिस्ट युनिव्हर्सिटी, बंगळूरचे प्रा. शैलेंद्र कदरे यांनी मशीन लर्निंगच्या कार्यपद्धती आणि प्रकारांवर माहिती दिली. स्कूल ऑफ बिझनेस अँड मॅनेजमेंट, बंगळूरचे प्रा. शिवाजी वासमकर यांनी मार्केटिंगमध्ये एआयचा प्रभावी वापर कसा करता येतो हे स्पष्ट केले. डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीचे डॉ. सिद्धेश्वर पाटील यांनी एआय, मशीन लर्निंग आणि विविध एआय टूल्सबद्दल माहिती दिली. राजारामबापू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, सांगलीचे डॉ. सचिन पाटील यांनी शैक्षणिक एआय टूल्सचे प्रात्यक्षिक दाखवले. आणि करिअरच्या संधींवर विचार मांडले. कॉलकॉम बहुराष्ट्रीय कंपनी, हैदराबाद येथील सीनिअर लीड अभियंते एम. शिवानी यांनी एआय चा चांगल्या पद्धतीने वापर करण्याचा सल्ला देत, वैयक्तिक माहिती शेअर न करण्याचे आवाहन केले. समारोप सत्राचे अध्यक्षस्थान प्रा. अस्मिता पाटील यांनी भूषवले. त्यांनी एआयचे ज्ञान असणे का महत्त्वाचे आहे, यावर भाष्य केले. यावेळी अनेक महाविद्यालयांतील प्राध्यापकांनी शोधनिबंध सादर केले. प्रा. डॉ. नीता धुमाळ यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी समन्वयक रोहिणी लोकरे आणि नीलेश क्षीरसागर यांनी प्रयत्न केले.

24 SEP 2025 तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात कर्मवीर भाऊराव पाटील जयंती



कोल्हापूर : विद्यापीठात कर्मवीरांना अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र कुलगुरु पी. एस. पाटील, व्ही. एन. शिंदे व इतर मान्यवर.

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठात आज रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक आणि थोर समाजसूधारक कर्मवीर भाऊराव पाटील यांची जयंती उत्साहाच्या वातावरणात साजरी करण्यात आली.

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.दिगंबर शिर्के आणि प्र–कुलगुरू डॉ.प्रमोद पाटील यांच्यासह मान्यवरांच्या उपस्थितीत विद्यापीठाच्या प्रांगणातील कर्मवीर पाटील यांच्या पूर्णाकृती पुतळयास पुष्प वाहून अभिवादन करण्यात आले. त्याचबरोबर मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये कर्मवीर पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ.विलास शिंदे, वित्त व लेखाधिकारी डॉ.सुहासिनी पाटील, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, क्रीडा संचालक डॉ.शरद बनसोडे, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. तानाजी चौगुले, आजीवन अध्ययन अधिविभागप्रमुख डॉ. रामचंद्र पवार, डॉ. धनंजय सुतार, प्राचार्य बी.पी.मरजे, डॉ. अवनिश पाटील, उपकुलसचिव डॉ.प्रमोद पांडव, भूगोल अधिविभागप्रमुख डॉ.सचिन पन्हाळकर, डॉ.संभाजी शिंदे, डॉ.धनश्री पोतदार, डॉ.मीना पोतदार, डॉ.ज्ञानेश्वर पवार, डॉ.प्रशांत पाटील, डॉ.सुधीर पोवार, डॉ.अभिजित पाटील, विजय गावडे, शुभम गिरीगोसावी उपस्थित होते.

तरूण भारत

# स्त्रीमुक्तीची चळवळ पुन्हा उभारण्याची गरज

■ खासदार सुप्रिया सुळे

प्रतिनिधी
कोल्हापूर

पुरूषांनी तंत्रज्ञान स्वीकारले असले तरीं महिलांबद्दलच्या विचाराची जळमटे अजूनही त्यांच्या मनात आहेत. एकविसाव्या शतकातही महिलांचा छळ होत आहे. त्यामुळे पुरोगामी महाराष्ट्रात स्त्रीमुक्तीची चळवळ पुन्हा उभारण्याची गरज असल्याचे मत खासदार सुप्रिया सुळे यांनी बुधवारी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठातील कै. श्रीमती शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासनाच्या वतीने आयोजित 'स्त्री सक्षमीकरण : आव्हाने आणि संधी' या विषयावरील व्याख्यानात त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. डॉ. भारती पाटील संपादित 'कर्तृत्ववान स्त्रिया भाग दोन" या पुस्तकाचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन झाले.

खासदार सुळे म्हणाल्या, राजर्षी छत्रपती शाहू महाराज, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुरोगामी महाराष्ट्रात आजही महिलांना हक्कासाठी झगडावे लागते. हीच मुळी पुरोगामी



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात पुस्तक प्रकाशन प्रसंगी खासदार सुप्रिया सुळे यांच्यासह डॉ. भारती पाटील, सरोज पाटील, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. पी. एस. पाटील, डॉ. व्ही. एन. शिंदे आदी उपस्थित होते.

महाराष्ट्राची अधोगती आहे. महिलांचे शिक्षणासह आर्थिक सबलीकरण झाले तरच त्या धाडसाने पुढे येऊन आपल्या हक्कासाठी झगडतील. तत्कालिन मुख्यमंत्री शरद पवार यांनी महिलांना आरक्षण दिले. परंतु आजही ग्रामपंचायत, जिल्हा परिषद, पंचायत समिती, महापालिकेतील महिलांची पदे त्यांचे पतीच चालवतात, ही मोठी शोकांतिका आहे.

सरोज पाटील म्हणाल्या, शेलकट नेसून फिरण्याच्या कालावधीमध्ये माझी आई शारदाबाई माझ्या वडीलांच्या प्रोत्साहनामुळे टांगा चालवत जाऊन शेती करीत होती. भुताच्या बंगल्यात राहून आम्हा भावंडाचा सांभाळ करीत होती, यातून माझ्या पवार घराण्याचे पुरोगामीत्व दिसून येते. प्रास्ताविक डॉ. भारती पाटील यांनी केले. सुत्रसंचालन डॉ. उर्मिला दशवंत व प्रांजली क्षीरसागर यांनी केले. आभार कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी मानले. यावेळी प्र–कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, व्ही. बी. पाटील, विजयमाला देसाई, डॉ. माया पंडित, डॉ. रूपा शहा, अनुराधा भोसले यांच्यासह महिला उपस्थित होत्या.